क्र. प्रशि/आस्था-2/प्रतिनियुक्ती/2011 /2974
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा 400 001
Addl. Director General of Police, Trg. & Spl. Units.
Maharashtra Rajya Police Mukhyalaya
Shaheed Bhagatsingh Marg, Colaba, Mumbai 400 001
email : adg.training.mumbai@mahapolice.gov.in
www.mahapolice.gov.in,

4 JUL 2011

**विषय : पोलीस प्रशिक्षण केंद्रातील पोलीस कर्मचाऱ्यांची पदे प्रतिनियुक्तीवर भरण्याबाबत. . .**

**परिपत्रक**

विविध पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये विविध घटकातील जिल्हा पोलीस / आयुक्तालय आणि राज्य राखीव पोलीस बलातील पोलीस शिपाई ते सहा. पोलीस उपनिरीक्षक यांना प्रतिनियुक्तीवर घेतले जाते. प्रशिक्षण केंद्रात कर्मचारी पाठविण्यासाठी त्यास सुसूत्रता येण्यासाठी खालील प्रमाणे धोरण ठरविण्यात येत आहे.

1) प्रशिक्षण केंद्रासाठी खालील पोलीस कर्मचारी त्यांच्या घटकामार्फत अर्ज करू शकतील.
   A) कवायत निदेशकाचे प्रशिक्षण पूर्ण केलेले.
   B) जड वाहन / हलके वाहन चालविण्याचा परवाना असलेले.
   C) संगणकावर मराठी टंकलेखनाचे काम करणारे.
   D) बिगुलर
   E) आयुधिक
   F) खेळाडू

2) प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर येण्यास इच्छूक पोलीस कर्मचाऱ्याची त्याच्या मुळ घटकात किमान 5 वर्ष सेवा पूर्ण झालेली असावी.

3) ज्या पोलीस कर्मचाऱ्यावर कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावीत आहे. त्यांचा प्रशिक्षण केंद्रासाठी विचार केला जाणार नाही.

4) प्रशिक्षण केंद्रात येणाऱ्या कर्मचाऱ्याचे वय हे 55 वर्षापेक्षा जास्त नसावे.

5) प्रशिक्षण केंद्रात येण्यास इच्छूक कर्मचारी हा शक्यतो इतर विभागात प्रतिनियुक्तीवर कार्यरत नसावा.

6) घटक प्रमुखाच्या शिफारशीशिवाय इच्छूक कर्मचाऱ्याची प्रतिनियुक्तीवर प्रशिक्षण केंद्रात बदली करण्यात येणार नाही.

7) या कार्यालयात परस्पर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

8) पोलीस कर्मचारी प्रशिक्षण केंद्रातील कर्तव्ये पार पाडण्यास शारिरीक दृष्टया सक्षम असावा.

9) पोलीस कर्मचाऱ्याचे अर्ज हे घटक प्रमुखांनी या कार्यालयात पाठविल्याच्या दिनांकापासून फक्त एका वर्षासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

10) अर्जदाराने अर्जासोबत कोणतेही जोडपत्र लावू नये.

11) घटक प्रमुखांनी पोलीस कर्मचाऱ्याची आवश्यक माहिती भरून ती प्रमाणित करणे आवश्यक राहील.

12) अपुर्ण अर्ज आणि शिफारस केलेली नसलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

13) सोबत दिलेल्या अर्जाच्या नमून्यातच पोलीस कर्मचाऱ्यांने अर्ज सादर करावेत.

14) प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची एक टप्पा पदोन्नतीची सुविधा त्या कर्मचाऱ्यास पोलीस प्रशिक्षण केंद्रात असेपर्यंतच मिळेल व तो त्याच्या मुळ संवर्गात परत गेल्यानंतर समाप्त होईल.

घटक प्रमुखांनी वरील सुचना सर्व पोलीस कर्मचारी निदर्शनास आणून यापुढे वरील अटी पूर्ण करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचे अर्ज या कार्यालयात पाठवावे.

<u>सध्या पोलीस प्रशिक्षण केंद्रात नव्याने मंजूर झालेल्या आणि प्रत्यक्षात रिक्त असलेली पदे भरण्यासाठी वरील अटींची पूर्तता करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचे अर्ज दि. 16/7/11 पर्यंत एकत्रित करून कृपया या कार्यालयात पाठवावे.</u>

अशोक शर्मा 5/7

**(अशोक शर्मा)**
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्ग सह)
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह)
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र 1 ते 15

प्रत सविनय सादर :

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई

प्रत :

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर
प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ-मुंबई, खंडाळा, नानवीज, अकोला, जालना, नागपूर, सोलापूर, बा. लातूर, तासगाव सांगली.
प्राचार्य अपारंपारीक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर
उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

# पोलीस प्रशिक्षण केंद्रासाठी प्रतिनियुक्तीवर येण्याकरिता भरावयाच्या अर्ज

## अ) अर्जदाराने सादर करावयाची माहिती

| | | |
|---|---|---|
| 1. | पोलीस प्रशिक्षण केंद्राचे नाव (जास्तित जास्त 3) | 1)<br>2)<br>3) |
| 2. | ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव नमूद करावे.<br>(कवायत निदेशक, चालक, मराठी टंकलेखक, आयुधिक, बिगुलर ) | |
| 3. | अर्जदाराचे पुर्ण नाव | |
| 4. | अर्जदाराचे पदनाम | |
| 5. | अर्जदाराचे वय | |
| 6. | सेवेत नियुक्ती दिनांक | |
| 7. | राज्य राखीव पोलीस गटातून जिल्हा बदली झाल्यास बदलीचा दिनांक | |
| 8. | कवायत निदेशक पूर्ण केल्याचे वर्ष | |
| 9. | जड / हलके वाहन चालविण्याचा परवाना (आहे / नाही) | |
| 10. | बिगुलर (आहे / नाही) | |
| 11. | आयुधिक (आहे / नाही) | |
| 12. | संगणक अभ्यासक्रम केले असल्यास त्याची माहिती | |
| 13. | खेळाडू असल्यास खेळाचा प्रकार | |
| 14. | विशेष प्रशिक्षण केले असल्यास त्याची माहिती | |

## ब) घटक कार्यालयाने सादर करावयाची माहिती.

| | | |
|---|---|---|
| 15. | अर्जदाराला मिळालेले एकूण बक्षीसे | |
| 16. | अर्जदाराला मिळालेले एकूण शिक्षा | |
| 17. | अर्जदारावर विभागीय चौकशी सुरू आहे किंवा आदेशित आहे काय. | |
| 18. | अर्जदार शारिरीक दृष्टया सक्षम आहे काय? | |

प्रमाणित करण्यात येते की, अर्जदार श्री ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... यांची वरील माहिती त्यांच्या सेवापटाच्या नोंदीवरून बरोबर असून त्यांचे विरूध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरू किंवा प्रलंबीत नाही. त्यांची प्रशिक्षण केंद्रात प्रतिनियुक्तीवर बदली करण्यास या कार्यालयाची शिफारस आहे.

दिनांक

सक्षम प्राधिकाराचे नाव व हुद्दा